दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा
• कोल्हापूर शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

# विवेकानंद कॉलेजच्या प्राचार्यपदी डॉ. मिलिंद हुजरे

**जनप्रवास : कोल्हापूर**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्रभारी सचिव प्राचार्य डॉ. मिलिंद शिवाजीराव हुजरे यांची कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या प्राचार्यपदी निवड करण्यात आली आहे.

यापूर्वी त्यांनी संस्थेचे अर्थसचिव म्हणून काम पाहिले असून संस्थेच्या शैक्षणिक, भौतिक सुविधा तसेच गुणवत्ता विकासासाठी महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडलेली आहे. सन १९८८ पासून प्राणीशास्त्र विषयाचे नामवंत प्राध्यापक म्हणून राजे रामराव कॉलेज, जत येथे त्यांच्या सेवेची सुरुवात झाली. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राणीशास्त्र विषयातील ३५ शोध निबंध प्रसिध्द केले आहेत. तसेच ४ आंतरराष्ट्री संशोधन प्रकल्प् यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ६ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. यापूर्वी त्यांनी प्राचार्य म्हणून पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, दत्ताजीराव कदम ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी, या शाखेवर काम केले असून इचलकरंजी शाखेला नॅकचे ए मानांकन प्राप्त् करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.

कोल्हापूर येथील विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नामवंत विवेकानंद महाविद्यालयात प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे व मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. तसेच विवेकानंद महाविद्यालयाच्या विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, गुरुदेव कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.




# विवेकानंद कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मोफत रोपांचे वाटप

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेजमध्ये मंगळवारी इकोक्लब मार्फत विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले. केंद्रशासनाकडील दिलेल्या सूचनेनुसार मिशन लाईफ ३.० अंतर्गत एक पेड माँ के नाम तसेच वृक्ष लागवड उपक्रम राबविणेसाठी विद्यार्थ्यांना १०० रोपांचे वाटप करण्यात आले. यामध्ये आपटा, कारंज, चिंच, भोकर, बेल, आवळा, सागवान, सीताफळ झाडांच्या रोपांचा समावेश होता. वनविभाग करवीर यांच्यामार्फत रोपांचा मोफत पुरवठा केला गेला. रोपांचे वाटप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ सी बी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. आयोजन ज्युनिअर कॉलेज इको क्लब मार्फत प्रमुख श्री एच. जी. पाटील, डॉ. ए. जे. पाटील यांनी केले.

यावेळी सायन्स विभाग प्रमुख एम. आर. नवले, गीतांजली साळुंखे, एस. टी. शिंदे, आर. व्ही. घाटगे यांच्यासह सर्व शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.